**शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका**
**कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,**
**शिवाजीनगर, पुणे – ०५**

**<u>जाहिर फेरनिविदा</u>**

शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका खालील तपशीलात नमूद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था, व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी शर्ती व इतर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल, पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**१. कोरे निविदा प्रपत्र विक्री –** निविदा गुरुवार दिनांक ११/०८/२०११ पासून ते गुरुवार दिनांक १८/०८/२०११ पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल.

**२. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ –** शनिवार दिनांक २०/०८/२०११ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत

**३. निविदा उघडण्याची वेळ** शनिवार दिनांक २०/०८/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

**४. निविदा दर** सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवश्यक आहे.

५. शिक्षण मंडळ, पुणे मनपाचे शैक्षणिक वर्ष २०११ – १२ अखेर खरेदी करावयाच्या बाबी व त्याचा तपशील

| अ.क्र. | तपशील | तरतूद | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी माध्यम शाळा विद्यार्थी भोजन **(फेरनिविदा)** | ५० लक्ष | २,०००/– |

**सूचना**

१. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी, स्पेसिफिकेशन, निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

२. कोणतीही निविदा स्विकारणे वा नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील.

३. सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका**

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन २०११ – १२**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक २०/०८/२०११**
**दुपारी १.०० वाजेपर्यंत**
**<u>फेरनिविदा स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था पुरविणे</u>**
**बयाणा रक्कम रूपये ५००००/–**

शिक्षण मंडळ, पुणे मनपामार्फत स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.), सहकारनगर, पुणे येथील शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार व भोजन पुरविण्यासाठी दोन लिफाफा (टु बीड सिस्टीम) पध्दतीने निविदा भरावयाची आहे.

सदर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वेळेचे दिवशी खालीलप्रमाणे आहार द्यावयाचा आहे

**विद्यार्थी संख्या –**

ज्यु केजी – १५०
सिनी. केजी – १५०
१ली – १००
२री – ५०
३री – ५०
४थी – ५०
५वी – ५०
६वी / ७वी – ५०
**एकूण विद्यार्थी संख्या – ७५०**
**स्टाफ – १००**

**दररोजचा मेनू**

२ फुलके + भाजी + भात + नाष्टा + दूध

**भाताचे प्रकार** – १. साधा भात २. दही भात ३. मसाला भात ४. मूग डाळ खिचडी ५. जिरा राईस ६. व्हेज पुलाव ७. नारळी भात (स्वीट)
**भाज्यांचे प्रकार** – १. कोबी २. फ्लॉवर ३. भेंडी ४. गवार ५. लाल भोपळा ६. दूधी भोपळा ७. बटाटा ८. कांदयाच्या चकत्या ९. पालक
**उसळ प्रकार** – १. मटकी २. मसूर ३. चवळी ४. मटार ५. हरबरा – छोले ६. राजमा (ग्रीन व्हाईट) मिक्स
**डाळीचे प्रकार** – १. साधे वरण २. आमटी ३. दाल फ्राय ४. दाल तडका ५. फोडणीचे वरण.
**सूपचे प्रकार** – १. टोमॅटो २. आमसूल ३. कढी ४. ताक ५. मिक्स व्हेज
**नाष्टा (स्नॅक्स)** – १. पोहे २. उपमा ३. इडली डोसा ४. पास्ता ५. नूडल्स ६. शिरा ७. साबुदाणा खिचडी
**सॅलड** – १. काकडी २. गाजर ३. टोमॅटो ४. कांदा ५. लिंबू ६. बीट ७. मुळा
**फळे** – १. सीझनल फ्रुट – केळी, चिकू, पेरू, सफरचंद, मोसंबी, पपई (सर्व फळांचे तुकडे, चकत्या किंवा पूर्ण १ फळ)

१. भात + व्हेज मिक्स (प्रत्येक विदयार्थ्यांस)
150 gm कच्चे तांदूळ – शिजवून 400 gm – 400 cal

२. भात उसळ मिक्स (प्रत्येक विदयार्थ्यांस)
135 gm कच्चे – शिजवून 350 gm – 400 cal

३. **स्नॅक्स (नाष्टा)**

प्रत्येक विदयार्थ्यांस 100 gm – cal 150

बालवाडी ते इ. २री पर्यंत.

प्रत्येक विदयार्थ्यांस 200 gm – cal 300

इ. ३री ते इ. ७वी पर्यंत.

**४. दूध**

100 ml दूध + 10 gm साखर cal – 100

बालवाडी ते इ. २री पर्यंत.

150 ml दूध + 10 gm साखर

इ. ३री ते इ. ७वी पर्यंत.

५. वरीलप्रमाणे दिलेल्या जेवण / नाष्टा यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असेल

नाष्टा / जेवणासाठीचा कच्चा माल
इंधन
वाहतूक
वेस्टेज
लेबर चार्ज
नफा व इतर

सदर पदार्थामध्ये मा. शिक्षण मंडळ सूचवेल त्यानुसार बदल करावा लागेल. तसेच निविदेसोबत हॉटेल/संस्था/फर्म यांचा आरोग्य विभागाकडील परवाना जोडणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे नाष्टा, दुपारचे भोजन एका विद्यार्थ्याचा एक दिवसाचा दर द्यावा.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजीनगर, पुणे ४११००५.
# स्व. राजीव गांधी अॅकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था करणेबाबत
# फेरनिविदा अटी व शर्ती सन २०११ – १२.

पुणे दैनिक सकाळ व दैनिक लोकमत दि. ११/०८/२०११ मध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर फेरनिविदा /भांडार/ स्व. राजीव गांधी अॅकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) सहकारनगर, पुणे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्थेबाबत. शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. मार्फत शैक्षणिक वर्ष २०११–१२ करिता खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून व्यक्ती/विक्रेता/वितरक/निविदाधारक यांजकडून अल्पोपहार व भोजन विशिष्ट मुदतीकरिता पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात येत असून, त्या निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**अटी व शर्ती :–**

१) निविदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निविदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२) निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असून **'अ'** पाकीटामध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

३) **अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

१. निविदा रकमेच्या शेकडा १ टक्के या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (डीडी) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा लागेल. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योजगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असेल तरीसुध्दा बयाणा व इतर रकमा रोख भराव्या लागतील.

२. निविदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र. (शॉपअॅक्ट) सदरच्या नोदणी पत्रात धंद्याच्या स्वरूपाची नोंद असणे आवश्यक आहे.

३. शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना अल्पोपहार व भोजन पुरविल्याबाबतची किंवा केटरिंग व्यवसायाचा २ वर्ष अनुभव असल्याची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे.

४. आर्थिक वर्ष २०१०–११ मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च २०११ अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.

५. निविदादाराने, आरोग्य विभाग, पुणे मनपा यांचेकडील अन्न परवाना मान्यतेचा दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे. सदरचा दाखला असल्याशिवाय पाकीट ब (दरपत्रकाचे पाकीट) उघडण्यात येणार नाही.

६. निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाणपत्राची (पॅन क्रमांक) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.

७. निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेच्या नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

८. व्यवसाय कर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.

९. निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करणेसंबधी आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅक प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हन्सी) चालू वर्षाची निविदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेची आवश्यक आहे.

१०. 'अ' पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळ, पुणे मनपा कार्यालयास तपासणीचे वेळी निविदादारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.

४) **'अ'** पाकीटामध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा.शिक्षण मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

५) पाकीट ब मध्ये निविदाधारकाने अल्पोपहार व भोजनाचा प्रति विद्यार्थी एका दिवसाचा सर्व करासह दर द्यावा पाकीटावर निविदाधारकाचे नाव, निविदा क्रमांक नमूद करून तो सिलबंद करून सादर करावा.

**६) निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था प्रती विद्यार्थी प्रती दिन, वाटपासह दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२. निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा तसेच पुर्ण अगर अशंतः मंजूर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील.

३. निविदाकरीता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत, संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

४. मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निविदादाराने

लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतून काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५. मान्य निविदादारास करार करतेवेळी स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा / अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (डीडी) किंवा रोखीने भरावी लागेल.

६. निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०११ – १२ करीताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रक्कमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजन पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत व स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजनाची वेळ कोणत्याही परिस्थितीत बदलून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा / वेळ बदलण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल.

९. शैक्षणिक वर्ष २०११ – १२ पर्यंत परिशिष्ठ ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजनाचा पुरवठा करावा लागेल. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजनाचा पुरवठा न केल्यास निविदादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

१०. करारनाम्यानुसार व स्पेसिफिकेशननुसार पुरवठा करावयाचे स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजनाचा पुरवठा शाळेत स्वखर्चाने जकातीच्या रक्कमेसह वेळेवर पोहोचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

११. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेतील अल्पोपहार व भोजन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या उपस्थितीच्या संख्येप्रमाणे दररोज शाळेत पुरवावा लागेल. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था स्पेसिफिकेशनप्रमाणे पुरविल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१२. निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा. शिक्षण मंडळ अथवा त्यांचे अधिकृत सभासद भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

१३. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार व भोजनाच्या आहारातून कोणत्याही स्वरूपाचा त्रास अथवा विषबाधेसारखी घटना घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदादारावर राहील तसेच प्रसंगी निविदादारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१४. एकदा भरलेली निविदा रदद्‍ करता येणार नाही एखाद्याला ती जर रदद्‍ करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल. तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१५. मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमूद केलेले काम मंजूर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम धनादेशाने परत केली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मूळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था पुरविणेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१७. निविदा एकास / अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास आहे.

१८. अल्पोपहार व भोजन स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेत पुरविल्यानंतर त्याची शिक्षण मंडळाने नियुक्त केलेल्या तपासणी आरोग्य अधिकाऱ्याकडून पाहणी करण्यात येईल. वेळोवेळी पुरविलेले अल्पोपहार व भोजन विहित नमुन्यात व तक्त्यात आहे किंवा नाही हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशनप्रमाणे नसलेले अल्पोपहार व भोजन कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही.

१९. कार्यालय स्पेसिफिकेशनप्रमाणे स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार व भोजनाचा दररोज पुरवठा करावा व महिन्याचे देयक मा. शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे मनपा यांचे नावे या कार्यालयास सादर करावे लागेल. स्व. राजीव गांधी ॲकेडमी ऑफ इ. स्कूल (प्राथ.) शाळेसाठी अल्पोपहार व भोजनाचा पुरवठा केलेबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांचे नाव, चव रजिस्टरची छायांकीत प्रत, मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शिक्यासह, तसेच नियुक्त केलेल्या तपासणी अधिकाऱ्याच्या शिफारशीसह निवेदन देयकासमवेत सादर करावे लागेल.

२०. निविदा **दिनांक २०/०८/२०११ रोजी दुपारी ३.०० वा.** किंवा मा. शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील. वेळी व प्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी

निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व प्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२१ मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश क्र. द/६७५/दि. २९/०३/२०११ अन्वये निविदा धारकाचे कुटूंबीय पुणे महानगरपालिकेमध्ये असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील आवश्यक ती सर्व माहिती निविदाधारकाने प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करणे बंधनकारक राहिल, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय व्यक्तीचे नाव, हुद्दा, निविदाधारकाशी नाते इ. तपशील स्पष्ट नमूद करण्यात यावा.

पुणे.

**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

# <u>प्रतिज्ञालेख</u>

मी श्री. ---------------------------------------------- वय --- वर्षे, व्यवसाय - धंदा, राहणार ------------------------------------------- निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील निविदेच्या, फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे. सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

**दिनांक :-**

**पुरवठा धारकाची नाव,सही व शिक्का**